• शुक्रवार, २४ डिसेंबर २००४ • पुण्यनगरी — कोल्हापूर

# राणी बंग यांना 'भद्रकाली ताराराणी' पुरस्कार प्रद

कोल्हापूर, दि. २४ (प्रतिनिधी) – अपप्रवृत्तींनी भरलेला समाज आणि सामाजिक जाण असणारा आदिवासी समाज यामध्ये खरा मागासलेपणा कोणामध्ये आहे, हा आजचा खरा प्रश्न आहे, असें प्रतिपादन डॉ.राणी बंग यांनी केले.

आदिवासी आणि स्त्री शिक्षणासाठी गडचिरोलीसारख्या भागात समाजसेवा करणाऱ्या डॉ. राणी अभय बंग यांना ताराराणी विद्यापीठातर्फे गुरुवारी 'भद्रकाली ताराराणी' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. मागास म्हणून केवळ आदिवासींनाच का संबोधले जाते, मोठे बंगले, चार–चार गाड्या म्हणजे विकास का, असे सवाल उपस्थित करून डॉ. बंग म्हणाल्या, आदिवासी भागात दारांना कुलूपे लावत नाहीत, तिथे चोऱ्या होत नाहीत, बलात्कार होत नाहीत. मोठ्या शहरात मात्र दररोज अनेक चोऱ्या होतात, दरोडे पडतात, नोकरीसाठी, शिक्षणासाठी बाहेर पडणाऱ्या सुशिक्षित स्त्रियांवर बलात्कार होतात. आदिवासी हुंडा देत नाहीत, शहरात मात्र हुंड्यासाठी स्त्रियांना मारले जाते. आदिवासी समाजात भिकारी नाही, तिथे शेजारचा माणूस जेवला आहे का याची खात्री केली जाते, शेजारी उपाशी झोपू नये याची दक्षता घेतली जाते, मग अशा आदिवासी समाजाला केवळ ते गरीब आहेत आणि तिथे काही प्रमाणात अंधश्रद्धा आहेत म्हणून मागास म्हणायचे का?

स्त्री शक्तीचा गौरव केला जात असला तरी आपल्या देशात स्त्रियांमध्ये खरंच शक्ती आहे का, असे विचारून त्या म्हणाल्या, निसर्गाने पुरुषापेक्षा तिला अधिक सक्षम बनविले, मात्र सामाजिक समस्येने



*समाजसेविका डॉ. राणी बंग यांना 'भद्रकाली ताराराणी' पुरस्कार प्राचार्य पी.व्ही. पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. (छाया: सचिन भोसले)*

मात्र तिला अबला बनविले. मोठी ताकद असणाऱ्या स्त्रियांमध्ये मानसिक ताकद असली तरी शारीरिक ताकद उरली आहे का? आज देशात गर्भपातामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या अधिक आहे. तसेच स्त्री भ्रूण हत्याचे वाढते प्रमाणही भयावह आहे, अशी स्थिती राहिल्यास आपले भविष्य अंधःकारमय आहे म्हणूनच या विघातक प्रवृत्तींना आळा घालण्याचे काम स्त्रियांनी करावे.

आपण ज्ञानयोगी आहोत ना कर्मयोगी आपण केवळ निरुपयोगी, असे प्रतिपादन प्राचार्य पी.बी. पाटील यांनी केले. ते म्हणाले, मुळातच समाजाचे पुनर्रचना करणे गरजेचे आहे. वरची रंगरंगोटी करून कोणताही प्रश्न सुटणार नाही, पण आपण प्रत्येक समस्येबद्दल बोलतो. पुस्तके लिहितो, पण कृतीत मात्र काहीच आणत नाही. परिवर्तन

करण्यासाठी आदि
जाण्याची गरज नाह
रहात असलेल्या भाग
करण्याची गरज आहे
बदलण्याची गरज आह

डॉ. बंग यांना 'भद्रक
पुरस्कार प्राचार्य पी.बी.
हस्ते प्रदान करण्यात
श्रीफळ, मानपत्र, मा
निधीची थैली असे य
स्वरूप आहे. या वेळी
यांनीही डॉ. बंग यांचा
समारंभाचे स्वागत तारारा
अध्यक्ष रामराव बेनाडीक
प्रास्ताविक कार्यकारो
कणबरकर यांनी केले
वाचन सचिव क्रांतीकुमार
केले. आभार अंजली साठे
समारंभास माजी खास
धारवाडे, माजी आमदार स
आदी मान्यवर उपस्थित